आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र -संध्याकाळी ७.०० वाजता
५ जून २०२५ - गुरूवार

**ठळक बातम्या**

- जागतिक पर्यावरण दिनानिमित्त राज्यासह देशभरात वृक्षारोपण आणि पर्यावरण विषयक कार्यक्रम

- समृद्धी महामार्गाच्या इगतपुरी ते आमणे या अखेरच्या टप्प्याचं मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन, ७०१ किलोमीटर लांबीचा महामार्ग वाहतुकीसाठी खुला

- निवडणुका संपल्यानंतरची बिनचूक आकडेवारी आणि अहवाल तयार करण्यासाठी केंद्रीय निवडणूक आयोगानं सुरू केली इंडेक्स कार्ड ही नवी तंत्रज्ञानाधारित प्रणाली

**आणि**

- इंडोनेशिया खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत चिराग शेट्टी आणि सात्विकसाईराज रंकीरेड्डी उपांत्यपूर्व फेरीत दाखल

**<><><><>**

देशभरात आज जागतिक पर्यावरण दिवस साजरा झाला. पर्यावरण रक्षणाबाबत जागरूकता आणि प्रत्यक्ष कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. संयुक्त राष्ट्र संघटनेनं १९७३ मध्ये आजच्या दिवशी सर्वप्रथम हा दिवस साजरा केला होता. हा दिवस १४३ हून अधिक राष्ट्रांमध्ये पर्यावरण संवर्धनाच्या विविध कार्यक्रमांच्या आयोजनाद्वारे साजरा केला जातो. 'प्लास्टिकमुळे होणाऱ्या प्रदूषणावर मात' ही यंदाच्या पर्यावरण दिनाची मुख्य संकल्पना होती.

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड तसंच प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना शुभेच्छा दिल्या.

**प्रधानमंत्री नरेंद्र मोदी** यांच्या नेतृत्वाखाली दिल्लीत विशेष वृक्षारोपण मोहीम राबवण्यात आली. प्रधानमंत्र्यांनी यावेळी वटवृक्षाचं रोप लावलं. प्रधानमंत्र्यांनी आज आपल्या निवासस्थानी शेंदराची रोपं लावली. केंद्रीय मंत्री **धर्मेंद्र प्रधान** यांनी आज पर्यावरण दिनानिमित्त नवी दिल्लीत एक पेड माँ के नाम मोहिमेच्या दुसऱ्या टप्प्याचा प्रारंभ केला.

<><><><>

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त राज्यातही विविध कार्यक्रमांचं आयोजित करण्यात आलं. या निमित्तानं **मुंबईत** आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते वातावरण बदलाबाबत जनजागृती करण्यासाठी जागतिक प्रचार मोहिमेचा प्रारंभ करण्यात आला. एकदा वापरलं जाणारं प्लास्टिक पर्यावरणाचा सर्वात मोठा शत्रू असून याचा वापर थांबवणं हा पर्यावरण संवर्धनासाठीचा महत्वपूर्ण निर्णय असल्याचं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. राज्य सरकारच्या १० कोटी वृक्षलागवड मोहिमेत नागरिकांनी सहभागी होण्याचं आवाहन त्यांनी केलं.

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांच्या उपस्थितीत **मुंबईत** गिरगाव चौपाटीवर एकदाच वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिक विरोधात मोहीम राबविण्यात आली. **नवी मुंबईत** सिडको व्यवस्थापकीय संचालकांच्या हस्ते जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण करण्यात आलं. **रत्नागिरी** इथंही वृक्षरोपण करण्यात आलं. एक पेड माँ के नाम उपक्रमात जिल्ह्यात २५ हजार झाडं लावण्याचं उद्दिष्ट ठरवण्यात आलं आहे.

**सोलापूर शहरात** राबवल्या जाणाऱ्या १ लाख वृक्षारोपण मोहिमेचा आज पर्यावरण दिनी प्रारंभ झाला. नागरिक, स्वयंसेवी संस्था आणि महिला बचत गटांनी मोहिमेत सहभागी होवून वृक्षारोपण मोहीम लोकचळवळ बनवावं, असं आवाहन महापालिका आयुक्तांनी केलं.

**जळगाव** शहरात आज पर्यावरण रक्षण जनजागृती रॅलीचं आयोजन करण्यात आलं होतं. या रॅलीत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी फलक आणि घोषणांद्वारे पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला.

**छत्रपती संभाजी नगरमध्ये** पर्यावरण जागरूकतेसाठी आयोजित केलेल्या सायकल रॅलीचं उदघाटन खासदार भागवत कराड यांनी केलं.

अहिल्यानगर जिल्ह्यातल्या **हिवरे बाजार** इथल्या मातृस्मृती वनमंदिरात चौदाशे देशी वृक्षांच्या लागवडीच्या मोहिमेचा पर्यावरण दिनी प्रारंभ झाला.

<><><><>

समृद्धी महामार्ग हा केवळ एक रस्ता नसून महाराष्ट्राच्या समृद्धीचा आर्थिक कॉरिडॉर आहे, असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज केलं. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गाच्या इगतपुरी ते आमणे या ७५ किलोमीटरच्या

अखेरच्या टप्प्याचं उद्घाटन केल्यानंतर ते बोलत होते. राज्यातले २४ जिल्हे जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरणाशी जोडणाऱ्या समृद्धी महामार्गानं राज्याचं एकीकरण केलं. लवकरच हा महामार्ग नव्याने तयार होत असलेल्या वाढवण बंदराशीही जोडला जाईल, यामुळे बंदर-केंद्रित विकास राज्याच्या कानाकोपऱ्यात पोहोचेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यावेळी उपस्थित होते.

समृद्धी महामार्गाच्या शेवटच्या टप्प्याचं काम पूर्ण झाल्यामुळे नागपूर ते मुंबई हा प्रवास फक्त आठ तासांत करता येणार आहे. नाशिक आणि ठाणे जिल्ह्यांमधून जाणारा या शेवटच्या टप्पा सह्याद्रीच्या पर्वतरागांमधून बोगदे आणि पुलांद्वारे पूर्ण केला आहे. यात जवळपास ११ किलोमीटर लांबीचे ५ बोगदे असून इगतपुरीतला ८ किलोमीटर लांब, १७ मीटरपेक्षा जास्त रुंद आणि ९ मीटरपेक्षा जास्त उंचीचा बोगदा राज्यातला सर्वात लांब आणि रुंद बोगदा आहे.

**<><><><>**

महिलांच्या सर्वांगीण विकासाकरिता आदिशक्ती अभियान राबवता यावं याकरिता येत्या १५ दिवसांत ग्रामसमित्या स्थापन करण्याचे निर्देश महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी आज मंत्रालयात झालेल्या बैठकीत दिले.

या अभियानाअंतर्गत विविध विभागांमधल्या महिलांच्या समस्या सोडवणे, हुंडा प्रथा थांबवणे, महिलांशी निगडित विविध योजनांबद्दल जनजागृती करणं असा व्यापक उपक्रम राबवला जाणार आहे.

**<><><><>**

आगामी आषाढी एकादशीची तयारी राज्यभरात सुरु झाली आहे. वारकऱ्यांना आता पंढरीच्या वारीला जाण्याचे वेध लागले आहेत. संत तुकाराम महाराज पालखी सोहळा १८ जूनला सुरू होईल आणि त्याच दिवशी पालखी देहूतून प्रस्थान करेल. तर, संत ज्ञानेश्वर महाराज पालखीचं प्रस्थान १९ जून रोजी होईल. दरवर्षी देशभरातून लाखो वारकरी पंढरपुरात येतात. या वारकऱ्यांनी आपल्या आरोग्याची विशेष काळजी घेण्याचं आवाहन सोलापूर जिल्हा प्रशासनानं केलं आहे.

**<><><><>**

केंद्रीय निवडणूक आयोगानं निवडणुका संपल्यानंतर तयार होणारे विविध आकडेवारी विषयक अहवाल जलदगतीनं तयार करण्यासाठी इंडेक्स कार्ड ही एक नवी तंत्रज्ञानाधारित प्रणाली सुरू केली आहे. इंडेक्स कार्ड ही निवडणूक आयोगाची स्वतःची मात्र कायद्यानं बंधनकारक नसलेली माहिती प्रणाली असेल. या माध्यमातून निवडणुकीनंतरची महत्त्वाची आकडेवारी संकलित केली जाईल. संशोधक, शिक्षणतज्ञ, धोरणकर्ते, पत्रकार आणि सामान्य नागरिकांना मतदारसंघनिहाय माहिती सुलभतेनं उपलब्ध व्हावी हा यामागचा हेतू असल्याचं निवडणूक आयोगानं म्हटलं आहे.

या नव्या तंत्रामुळे निवडणुकांनंतरचे अचूक अहवाल जलदगतीनं उपलब्ध होईल. या अहवालात राज्य तसंच मतदारसंघानुसार मतदारांचा तपशील, मतदान केंद्रांची संख्या, महिला मतदारांचा सहभाग, राष्ट्रीय तसंच राज्य पक्ष आणि नोंदणीकृत पक्षांची कामगिरी, विजयी उमेदवारांविषयीचं विश्लेषण, मतदारसंघनिहाय निकाल आणि एकत्रित सारांश अहवाल उपलब्ध होऊ शकणार आहे.

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारला ११ वर्ष पूर्ण झाली असून या कार्यकाळात देशातल्या जनतेची आर्थिक क्षमता सुधारण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजना, प्रधानमंत्री उज्ज्वला योजना, जन धन योजना आणि आयुष्यमान भारत सारख्या विविध योजना शासनानं सुरू केल्या. या योजनांचा लाभ २५ कोटींहून अधिक जनतेनं घेतला असून देशातल्या पायाभूत सोयीसुविधा आणि आत्मनिर्भर भारत निर्माण करण्यावर केंद्र सरकार जोर देत असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सामाजिक माध्यमांवरील पोस्टमध्ये म्हटलं आहे.

**<><><><>**

केंद्र सरकारनं बकरी ईदनिमित्त ६ जून २०२५ रोजी सार्वजनिक सुट्टी जाहीर केल्याचा दावा करणारी एक पोस्ट समाजमाध्यमांवर फिरत आहे. मात्र या पोस्टमधला दावा तथ्यहीन आणि खोटा असल्याचं केंद्र सरकारनं स्पष्ट केलं आहे. देशभरात अनेक भागांमध्ये ईद ६ जून रोजी साजरी केली जाणार असल्याची शक्यता असली तरी या दिवशी सरकारनं कोणतीही सुट्टी जाहीर केलेली नसल्याचं सरकारनं स्पष्ट केलं आहे.

**<><><><>**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नाशिकमधले उप-नेते सुधाकर बडगुजर यांना पक्षातून काढून टाकल्यानंतर त्यांच्या जागी पक्षाचे सह संपर्क प्रमुख दत्ता गायकवाड यांची नियुक्ती झाली आहे.

बडगुजर यांनी पक्षविरोधी कारवाया केल्याच्या कारणावरुन त्यांना पक्षातून काढून टाकण्यात आलं. बडगुजर यांना भाजपात प्रवेश देण्याचे संकेत प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांना आज नाशिकमधे घेतलेल्या पत्रकार परिषदेत दिले.

<><><><>

इंडोनेशिया खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत पुरुष दुहेरी प्रकारात आज झालेल्या सामन्यात भारताची चिराग शेट्टी आणि सात्विकसाईराज रंकीरेड्डी ही जोडी
उपांत्यपूर्व फेरीत पोहोचली आहे. त्यांनी डेन्मार्कच्या रासमुस केजर आणि फ्रेडरिक सोगार्ड या जोडीचा १६-२१, २१-१८,२२-२० असा पराभव केला.

दरम्यान, भारताच्या पी.व्ही. सिंधू हिला थायलंडच्या पोर्नपावी चोचुवोंगकडून २२-२०,१०-२१,१८-२१ असा पराभव पत्करावा लागला. तर महिला दुहेरीत ट्रीसा जॉली आणि गायत्री गोपीचंद या जोडीचा मयू मात्सुमोतो आणि युकी फुकुशिया या जापानी जोडीने १३-२१,२२-२४ असा पराभव केला.

<><><><>

महिलांच्या हॉकी आशिया चषक २०२५ स्पर्धेचं वेळापत्रक जाहीर करण्यात आलं आहे. ही स्पर्धा ५ ते १४ सप्टेंबर दरम्यान चीनमधल्या हांगझो शहरात खेळली जाणार आहे. या स्पर्धेत भारताच्या महिला हॉकी संघाचा पहिला सामना ५ सप्टेंबरला थायलंडच्या संघाबरोबर होणार आहे. भारतीय संघाचा समावेश ब गटात करण्यात आला असून जपान, थायलंड,  सिंगापूर हे देशही याच गटात असतील.

<><><><>

राज्यात येत्या तीन दिवसात तुरळक ठिकाणी वादळी वारे, मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटात पाऊस कोसळणार असल्याचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. ३० पेक्षा अधिक जिल्ह्यांमध्ये 'यलो अलर्ट' जारी करण्यात आला आहे. शेतकऱ्यांनी सतर्क राहावं असं आवाहन प्रशासनानं केलं आहे.

कोकणात मुंबई, ठाणे, रायगड, रत्नागिरी, मध्य महाराष्ट्रात - पुणे , नाशिक, जळगाव, धुळे, सातारा, सांगली, सोलापूर, अहमदनगर, मराठवाड्यात - छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, हिंगोली, परभणी, धाराशिव, तर विदर्भात - नागपूर, अकोला, अमरावती, वर्धा, यवतमाळ, वाशिम, बुलडाणा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, भंडारा या जिल्ह्यांना हवामान विभागानं यलो अलर्ट दिला आहे.

**//<><><><>//**